**ज्योतिषविषयक**
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
**तपस्वी हॉटेल बेसमेंट, ९ इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७७ वा | शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘पटेल, तटकरे, अरोरा...’ पवारांचे गंभीर आरोप

## अजित पवारांच्या विमान दुर्घटनेवर नवे प्रश्न



**मुंबई (कटूसत्य वृत्त):** दिवंगत उपमुख्यमंत्री यांच्या विमान अपघातप्रकरणी आमदार यांनी गुरुवारी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित करत प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि नरेश अरोरा यांची नावं घेत संशय व्यक्त केला. ‘हा अपघात आहे की घातपात? हाच आज सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे,’ असे ठामपणे सांगत त्यांनी २७ आणि २८ जानेवारीदरम्यान घडलेल्या घटनांची साखळी मांडली.

रोहित पवार यांनी दावा केला की, अपघाताच्या आदल्या दिवशी एका महत्त्वाच्या फाईलवर सही व्हावी, यासाठी मोठ्या नेत्याकडून आग्रह धरण्यात आला होता. त्यामुळेच अजित पवार यांना निघण्यास उशीर झाला आणि शेवटच्या क्षणी विमानाने प्रवास करण्याचा निर्णय घ्यावा लागला. ‘संध्याकाळी ७ वाजून १३ मिनिटांनी विमानाचे बुकिंग झाले. जर आधीच विमानाने जाण्याचा निर्णय झाला असता, तर २६ किंवा २७ तारखेलाच बुकिंग झाले असते,’ असा मुद्दा त्यांनी मांडला.

त्यांच्या मते, जर २७ जानेवारीला अजित पवार पुण्याला कारने गेले असते, तर पुढील दिवशी बारामतीला पोहोचले असते आणि ही दुर्घटना टळली असती.

**अरोरांच्या कॉन्ट्रॅक्टवरून वाद?**

नरेश अरोरा यांच्या कंपनीचा शेकडो कोटी रुपयांचा करार रद्द करण्याच्या भूमिकेत अजित पवार होते, असा दावा रोहित पवार यांनी केला. ‘त्या करारावरून वाद झाले होते. काही ठराविक नेत्यांची भूमिका होती की काम सुरूच राहिले पाहिजे, मात्र दादांची भूमिका त्याविरोधात होती,’ असे ते म्हणाले. २७ तारखेला उशिरापर्यंत झालेल्या चर्चेत या कराराचा मुद्दा उपस्थित होता, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

रोहित पवार यांनी सांगितले की, एका फाईलसंदर्भात प्रफुल्ल पटेल यांचा फोन आला होता, असा उल्लेख प्रमोद हिंदूराव यांनी केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २७ तारखेला सुनील तटकरे उशिरापर्यंत अजित पवारांसोबत होते, असेही त्यांनी नमूद केले. जरी त्यांनी थेट आरोप टाळले असले, तरी ‘मी कोणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाही, मात्र सर्व घटनांची सखोल चौकशी व्हावी,’ अशी मागणी त्यांनी केली.

रोहित पवार यांनी असा उल्लेख केला की सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांनी अमित शहा व नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्या भेटीत अपघाताच्या कारणांचा शोध लागावा, अशी मागणी केली गेली असावी, असे ते म्हणाले. ‘मला अद्याप वेळ मिळालेला नाही, मात्र मी मेलद्वारे माझे प्रश्न मांडणार आहे,’ असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या चार महिन्यांपासून अजित पवार राजकीयदृष्ट्या एकटे पडल्यासारखे दिसत होते, असा खळबळजनक दावा रोहित पवार यांनी केला. ‘देशपातळीवरील आणि राज्यपातळीवरील काही लोक त्यांच्यासोबत नव्हते. मात्र काही मोजके आमदार आजही त्यांच्या अपघाताबाबत आवाज उठवत आहेत,’ असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट एनडीएसोबत जाणार होता का, या प्रश्नावर त्यांनी थेट उत्तर देण्याचे टाळले. ‘सोमवार किंवा मंगळवारी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन सर्व गोष्टी स्पष्ट करणार आहे. सत्तेत जायचे असते तर आम्ही केव्हाच गेलो असतो,’ असे त्यांनी सांगितले.

रोहित पवार यांनी २७ ते २८ जानेवारीदरम्यानच्या सर्व घटनांची सखोल चौकशी व्हावी, अशी पुनरुच्चाराने मागणी केली. विशेषतः प्रमुख पायलटने त्या काळात कोणाला भेटले, कोणाच्या संपर्कात होते, याची तपासणी व्हावी, असे त्यांनी नमूद केले.


दरम्यान, या गंभीर संकेतांवर संबंधित नेत्यांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. रोहित पवार यांनी जाहीर केलेल्या आगामी पत्रकार परिषदेत आणखी कोणते खुलासे होतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांच्या निधनाभोवतीचे गूढ अधिकच गहिरे होत असताना ‘अपघात की घातपात?’ हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## राज्यातील ९०० बोगस दिव्यांग संस्थांची नोंदणी रद्द

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात अपंगांच्या कल्याणार्थ कार्यरत असलेल्या ९०० संस्थांवर दिव्यांग कल्याण विभागाने अनियमिततेप्रकरणी कठोर कारवाईचा बडगा उगारला असून त्यांची नोंदणी रद्द केली आहे. चालू वर्षात ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून कोकण ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा त्यामध्ये समावेश आहे.

अपंगांच्या क्षेत्रात राज्यात दोन हजार संस्था कार्ययरत आहेत. आरोग्य, कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण, पुनर्वसन, संशोधन व विकास, शिक्षण-प्रशिक्षण या क्षेत्रात या संस्था काम करतात. यापैकी काही संस्था शासकीय अनुदानीत आहेत तर काही संस्था सामाजिक उत्तरदायित्व निधीवर (सीएसआर) चालतात. अपंगांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणीचे बंधनकारक आहे.

ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार या संस्थांसाठी कार्यप्रणाली निश्चित केलेली आहे. या संस्थांमध्ये अशासकीय (एनजीओ) संस्थांची मोठी संख्या आहे. २०१२ पासून अशा संस्थांवर कारवाई करण्यात येत आहे. अपात्रतेची कारवाई करण्यात आलेल्या संस्थांची संख्या ५३७ होती. या वर्षी त्यामध्ये ३६३ संस्थांची भर पडली आहे. दिव्यांग व्यक्तींचे



सक्षमीकरण व पुनर्वसन योग्य पद्धतीने व्हावी. निधीचा विनियोग अपंगांच्या कल्याणार्थ खर्च व्हावा, असा या संस्थांवरील कारवाई मागे हेतू असल्याचा दिव्यांग कल्याण विभागाचा दावा आहे.

या वर्षी नोंदणी रद्द केलेल्या संस्थांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७, बीड १७, नागपूर २६, पुणे २३ आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील १७ संस्थांचा समावेश आहे. यातील काही संस्था शासनाकडून तर काही संस्था सीएसआर मधून अपंग सक्षमीकरणाचे काम करत होत्या. मात्र त्यांनी दिव्यांग कल्याण विभागाने जारी केलेले संस्था नोंदणीचे निकष पाळले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

**नोंदणी महत्वाची - तुकाराम मुंढे**

दिव्यांग क्षेत्रातील संस्थानी आयुक्तालयाकडे नोंदणी केल्यामुळे त्यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण व पुनर्वसन योग्य पद्धतीने होईल. हे कार्य करताना दिव्यांगांच्या हक्कांचे, अधिकारांचे उल्लंघन होणार नाही. सर्व संस्थानी नोंदणी करून, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार त्याअंतर्गत नियमावली व शासनाने निर्गमित केलेल्या धोरणानुसार कार्य करणे अपेक्षित आहे. जेणेकरून दिव्यांगांचे पुनर्वसन व सक्षमीकरण साध्य करणे शक्य होईल, असे विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचे म्हणणे आहे. दिव्यांग क्षेत्रात कार्यरत सर्व प्रकारच्या संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी बंधनकारक आहे. या क्षेत्रातील संस्थांनी २८ फेब्रुवारी पर्यंत नोंदणी करावी. अन्यथा संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार यापुढेही कारवाई करण्यात येईल.

**- तुकाराम मुंढे, सचिव,**
दिव्यांग कल्याण विभाग.

## एपस्टाईन प्रकरणी हरदीप सिंग पुरींनी तात्काळ राजीनामा द्यावा

### पंतप्रधानांनी देशाची माफी मागावी - काँग्रेस पक्षाची जोरदार मागणी

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** अमेरिकेतील कुप्रसिद्ध बाल लैंगिक अत्याचारी व मानव तस्कर जे एपस्टाईन याच्याशी केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांचे नाव जोडले गेल्यामुळे देशाच्या राजकीय वतुर्ळात तीव्र खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, मंत्री हृदीपसिंग पुरी यांनी अलीकडेच आपण एपस्टाईन याला दोन-तीन वेळा भेटलो असल्याचे मान्य केल्याची माहिती समोर आली आहे.

एपस्टाईनसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेल्या व्यक्तीशी संबंध येणे ही अत्यंत गंभीर बाब असून त्यामुळे देशाची प्रतिमा मलिन झाल्याची टीका काँग्रेस पक्षाकडून करण्यात आली आहे.

नैतिकतेच्या प्रश्नावर केंद्र सरकार मौन बाळगत असल्याने जनतेमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.




या पार्श्वभूमीवर आज संसद भवन संकुलात सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस व इतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी जोरदार निदर्शने केली. आंदोलनादरम्यान हरदीप सिंग पुरी यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

काँग्रेस पक्षाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, अशा लज्जास्पद आणि नैतिकतेला तडा देणाऱ्या प्रकरणात संबंधित मंत्र्यांनी तात्काळ पदाचा राजीनामा द्यावा. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेची माफी मागावी आणि या प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी जाहीर करावी.

देशाच्या सन्मानाशी निगडित प्रश्नावर काँग्रेस पक्ष कोणतीही तडजोड करणार नाही, आणि सत्य बाहेर येईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

## फेक अकाउंटद्वारे आयुक्तांच्या नावाने पैशांची मागणी; सायबर गुन्हा दाखल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका चे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नावाने आणि छायाचित्राचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीने व्हॉट्सअॅप व फेसबुकवर बनावट अकाउंट तयार केल्याची घटना समोर आली आहे.

या फेक अकाउंटद्वारे मित्र, नातेवाईक व नागरिकांकडे फोन व चॅटच्या माध्यमातून पैशांची मागणी केली जात आहे. प्रकार गंभीर स्वरूपाचा असून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आयुक्तांनी यासंदर्भात सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून नागरिकांनी अशा कोणत्याही संदेशांना प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ‘व्यापार करार शेतकऱ्यांच्या विरोधात’ आरोप करत संसद भवनात गांधींची शेतकरी नेत्यांशी बैठक

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसद भवनात देशभरातील विविध शेतकरी संघटनांच्या प्रमुखांची आणि नेत्यांची भेट घेत केंद्र सरकारच्या प्रस्तावित व्यापार धोरणावर तीव्र टीका केली. अमेरिकेसोबत होऊ घातलेल्या व्यापार करारामुळे भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याचा आरोप त्यांनी केला.

बैठकीनंतर बोलताना गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत, ‘अमेरिकेसमोर शरण जाऊन घेतलेल्या निर्णयांमुळे देशातील शेतकऱ्यांना अंधारात ढकलले जात आहे,’ असा आरोप केला. या करारामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना भारतात त्यांचे कृषी उत्पादन विकून नफा कमावण्याची संधी मिळेल, तर भारतीय शेतकऱ्यांना स्पर्धेत टिकणे कठीण जाईल, असे त्यांनी म्हटले.

गांधी यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, ‘जर मोदी सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर देशव्यापी आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांच्या हक्कांचे रक्षण



करण्यासाठी काँग्रेस आणि शेतकरी संघटना रस्त्यावर उतरतील.’

या बैठकीत विविध राज्यांतील शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी आपल्या-आपल्या राज्यांतील परिस्थिती, उत्पादन खर्च, आयात धोरणाचे परिणाम आणि किमान आधारभूत किंमत (एमएसपी) संदभार्तील मुद्दे मांडले.

बैठकीस अखिल भारतीय किसान काँग्रेस सुखपाल सिंह खैरा, ग्रामीण किसान मजदूर समिति (राजस्थान) रणजीत सिंह संधू, भारतीय किसान मजदूर युनियन (हरियाणा) अधिवक्ता अशोक बलहारा, केएमएम (केरळ) पी. टी. जॉन, बीकेयू क्रांतिकारी बलदेव सिंग झिरा, प्रोग्रेसिव्ह फार्मर्स फ्रंट आर. नंदकुमार, बीकेयू शहीद भगतसिंग अमरजीत सिंग मोहरी, अखिल भारतीय किसान काँग्रेस अखिलेश शुक्ला, आम किसान युनियन केदार सिरोही, किसान काँग्रेस (पंजाब) किरणजीत सिंग संधू, राज्यसभा सदस्य गुरप्रीत सिंग संघा, किसान मजदूर मोर्चा-भारत गुरमनेट सिंग मंगट, जम्मू आणि काश्मीर जमीनदारा फोरम हमीद मलिक, केएमएम तेजवीर सिंग, हरियाणा किसान संघर्ष समिती धरमवीर गोयत, कृषक समाज ईश्वर सिंग नैन, दक्षिण हरियाणा किसान युनियन सतबीर खटाना यांच्यासह देशभरातील शेतकरी नेत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बैठकीत सहभागी नेत्यांनी सांगितले की, आयात-निर्यात धोरणात शेतकऱ्यांचा आवाज ऐकला गेला पाहिजे. परदेशी उत्पादनांना खुले दरवाजे दिल्यास देशांतर्गत बाजारपेठ कोलमडू शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, केंद्र सरकारकडून या आरोपांवर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या मुद्द्यावरून संसदेत तसेच राज्यांमध्ये राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. शेतकरी संघटनांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे येत्या काळात कृषी धोरणावर व्यापक राजकीय संघर्ष उभा राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सुशोभीकरण दर्जाहीन

### शिवजन्मोत्सव महामंडळाचा महापालिकेला जाब

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** शहराच्या अभिमानाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सुशोभीकरणाच्या कामावरून नव्याने वादंग निर्माण झाला आहे. करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असून त्यात ऐतिहासिकतेचा अभाव असल्याचा आरोप शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. हे काम ना शिवभक्तांना समाधानकारक वाटले, ना सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या, अशी स्पष्ट भूमिका महामंडळाने मांडली आहे.

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत पदाधिकाऱ्यांनी महापालिका प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. जनभावनेचा आदर राखत मध्यवर्ती महामंडळ



जनतेसोबत ठामपणे उभे असल्याचे सांगत, येत्या १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शिवजयंती उत्सवानंतर या विषयावर व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाशी निगडित असलेल्या स्थळाचे सुशोभीकरण करताना ऐतिहासिक संदर्भ, वास्तुरचना आणि दर्जा यांचा सखोल विचार होणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात झालेले काम अत्यंत दर्जाहीन असून त्यामध्ये कोणतीही ऐतिहासिक झलक किंवा प्रेरणादायी स्वरूप दिसून येत नाही. त्यामुळे हे काम शिवभक्तांच्या भावना दुखावणारे ठरत आहे.

या प्रकरणी शहरातील शिवभक्त, नागरिक व विविध सामाजिक संघटनांची संयुक्त बैठक लवकरच घेण्यात येणार असून महापालिका प्रशासनाला जाब विचारण्यात येणार आहे. सुशोभीकरणाच्या नावाखाली करण्यात आलेल्या कामाचा खर्च, दर्जा आणि नियोजन याबाबत पारदर्शक माहिती देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना राजन जाधव यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही परिस्थितीत (पान 2 वर..)

SOLAPUR ELECTRONICS DEALER'S ASSOCIATION
SEDA
सोलापूरचे सर्वात मोठे प्रदर्शन
Electro 2026
MAIN SPONSORS
V PLUS
CO-SPONSORS
HYFFA | APAR | LAXMI AUTOMOBILES
EDUCATIONAL PARTNERS | FINANCE PARTNER | EVENT PRODUCTION BY
BAJAJ FINANCE | Satisfied
100 हून अधिक मोठे ब्रँड्स, हजारो पर्याय!
फक्त पाहायला नाही, घ्यायला या!
इलेक्ट्रॉनिक्स | होम अप्लायन्सेस | कम्प्यूटर्स
सोलर प्रोडक्ट्स | हेल्थ इक्विपमेंट्स
▪ 100% ओरिजिनल प्रॉडक्ट्स
▪ कंपनी वॉरंटी ▪ योग्य दराची हमी
12 ते 18 फेब्रुवारी 2026
दुपारी 4:00 ते रात्री 9:30 (रविवार सकाळी 11 पासून)
दररोज लकी ड्रॉ, शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ!
होम मैदान, सोलापूर
300+ स्टॉल्स आणि भरघोस डिस्काउंट्स!
For More Details about Electro Scan this QR Code

## संपादकीय

# डीजीसीएचे ऑडिट आणि वाढते संशय

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला पंधरा दिवस उलटले, तरीही या दुर्घटनेभोवतीचे प्रश्न संपण्याऐवजी अधिकच गडद होत आहेत. २८ जानेवारी रोजी सकाळी सुमारे पावणे नऊच्या सुमारास मुंबईहून बारामतीकडे जात असताना त्यांचे विमान अपघातग्रस्त झाले. या घटनेनंतर केवळ शोक नव्हे, तर संशयाचीही छाया राज्याच्या राजकारणावर पसरली आहे.

या प्रकरणात आमदार रोहित पवार यांनी सातत्याने व्हिएसआर व्हेंचर्स या कंपनीच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अजित पवार हे याच कंपनीच्या मालकीच्या लियरजेट विमानातून प्रवास करत होते. विमानांची देखभाल, पायलट्सच्या शिफ्ट्स, तांत्रिक त्रुटी, २०२३ मधील एका अपघाताचा अहवाल अद्याप न जाहीर होणे आणि युरोपियन विमान सुरक्षा संस्थेकडून (एअरअ) झालेली कारवाई या सर्व मुद्द्यांचा दाखला देत रोहित पवार यांनी कंपनीवर संशय व्यक्त केला.

आता नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात Directorate General of Civil Aviation (डीजीसीए) यांनी देशातील चार्टर कंपन्यांचे स्पेशल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात १४ प्रमुख कंपन्यांची तपासणी होणार असल्याची माहिती आहे. मात्र, अजित पवार यांनी प्रवास केलेल्या कंपनीचे नाव या यादीत नसल्याने नव्या शंका उपस्थित होत आहेत.

हा योगायोग आहे की जाणूनबुजून घेतलेला निर्णय? याचे स्पष्ट उत्तर अद्याप मिळालेले नाही. परंतु पारदर्शकतेच्या दृष्टीने हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जर कंपनीविषयी गंभीर आरोप समोर आले असतील, तर अशा कंपनीचा समावेश ऑडिटमध्ये अग्रक्रमाने व्हायला हवा होता, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

रोहित पवार यांनी आणखी एक गंभीर आरोप केला आहे. डीजीसीएचे काही माजी कर्मचारी संबंधित कंपनीत कार्यरत असल्याचे. ही बाब खरी असेल, तर 'रेग्युलेटर' आणि 'रेग्युलेटेड' यांच्यातील सीमारेषा धूसर होत असल्याचा संशय निर्माण होतो. कोणतीही नियामक संस्था केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नसते; ती निष्पक्ष दिसणे देखील तितकेच महत्त्वाचे असते.

डीजीसीएच्या स्पेशल ऑडिटमध्ये विमानांची तांत्रिक स्थिती, इंजिनची तपासणी, नियमित देखभाल आणि सुरक्षा प्रोटोकॉलची अंमलबजावणी यांचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. ही प्रक्रिया स्वागतार्ह असली, तरी त्यात वादग्रस्त कंपनीचा समावेश नसल्यास जनतेच्या मनातील शंका अधिकच वाढतील.

या प्रकरणाचा गाभा एकच सत्य आणि पारदर्शकता. अजित पवार यांचा मृत्यू हा केवळ एका नेत्याचा दुर्दैवी अंत नाही; तो विमान सुरक्षा व्यवस्थेची आणि नियामक संस्थांच्या विश्वासार्हतेचीही कसोटी आहे. जर सर्व काही नियमांनुसार झाले असेल, तर निष्पक्ष चौकशी आणि स्पष्ट अहवाल सरकारलाच दिलासा देतील. पण जर कुठे दुर्लक्ष, संगनमत किंवा हितसंबंधांचा संघर्ष आढळला, तर कठोर कारवाई अपरिहार्य ठरेल.

राजकारण, आरोप-प्रत्यारोप आणि भावनिक वातावरण यापलीकडे जाऊन या प्रकरणाची उच्चस्तरीय, स्वतंत्र आणि वेळबद्ध चौकशी होणे आवश्यक आहे. अन्यथा 'योगायोग' आणि 'संशय' यांच्यातील रेषा अधिकच धूसर होईल. आणि त्याचा फटका व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला बसेल.

पान १ वरून

## छत्रपती शिवाजी महाराज...

सदरचे काम पुन्हा करण्यात यावे आणि ते ऐतिहासिक दर्जाचे, शिवचरित्राला साजेसे व प्रेरणादायी स्वरूपाचे असावे, ही ठाम मागणी मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. जनतेच्या भावना लक्षात न घेता करण्यात आलेले काम आम्ही स्वीकारणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, या वादामुळे शहरात चर्चा रंगली असून, अनेक नागरिकांनीही सामाजिक माध्यमांवरून सुशोभीकरणाच्या कामावर टीका केली आहे. ऐतिहासिक वारशाशी संबंधित काम करताना अधिक संवेदनशीलता आणि दर्जेदार नियोजन आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक हे केवळ चौक नसून शहराच्या अस्मितेचे प्रतीक आहे. त्यामुळे येथे करण्यात येणारे कोणतेही काम हे इतिहासाशी सुसंगत, सौंदर्यपूर्ण आणि दर्जेदार असावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. आता या प्रकरणात महापालिका प्रशासन काय भूमिका घेते आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणते निर्णय घेतले जातात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## मुंबई महानगर क्षेत्रात 'पॉड टॅक्सी'साठी महापालिकांनी आराखडा तयार करा- उपमुख्यमंत्री शिंदे



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** : प्रवाशांना घरापासून ते थेट कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई 'एमएमआर' क्षेत्रातील महापालिकांनी पॉड टॅक्सी सुरू करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मेट्रो आणि लोकल प्रवासाला पूरक अशी 'पॉड टॅक्सी' सेवा 'एमएमआर'मधील शहरांत सुरू करण्याबाबत सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला. नागरिकांना 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' देण्यास महापालिकांनी प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

नंदनवन येथे झालेल्या आढावा बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, 'एमएमआरडीए'चे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, आदी अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रवाशांना घरापासून रेल्वे किंवा मेट्रो स्टेशनपर्यंत आणि तिथून गंतव्य स्थान हा टप्पा पार करण्यासाठी रिक्षा किंवा बसवर अवलंबून राहावे लागते. यासाठी होणारी गर्दी, तसेच रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पॉड टॅक्सी चालवण्याचे नियोजन करावे. यामुळे मेट्रोचा वापर वाढण्यास मदत होईल आणि रस्त्यांवरील खासगी वाहनांचा भार कमी होईल. हा प्रकल्प राबवण्यासाठी 'एमएमआरडीए'ची मदत घेण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

महापालिकांनी आपल्या विकास आराखड्यात लास्ट माईल कनेक्टिव्हिटीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. या सेवेमुळे प्रवाशांचा वेळ वाचणार असून इंधन बचतीमुळे पर्यावरणाचे रक्षण होईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे?

'आयुष्यातील निराशा अवस्थेतील अभिव्यक्ती असणारे हे गीत 'सामना' चित्रपटातील आहे.'ऐतखाऊ, हरामखोर, ऐदी, परपोषी आणि आळशी लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. दुसऱ्याच्या कष्टावर, कमाईवर आणि नावावर डल्ला मारण्याची खोड अनेक जण बाळगून आहेत. स्वतःच्या ऐशआरामासाठी इतरांचे शोषण करणारे रक्तपिपासू लोकही पाहायला मिळतात. कामचुकार, दलाल, नाफेखोर आणि चंगळवादी यांचा तर उच्छाद माजलेला आहे. अशा नैराश्यमय वातावरणात काबाडकष्ट करणारे, मरमर मरणारे आणि इमानदारीने जगणाऱ्यांचा कोणीही वाली राहिलेला नाही.

या साऱ्या गोष्टी पाहिल्यानंतर निसर्गातील जीवनचक्राकडे लक्ष जाते. तसे पाहिले तर माणूस, इतर प्राणी, बुरशी, पक्षी, कीटक, कृमी हे सर्वच परपोषित आहेत. अन्नासाठी ते सर्वजण वनस्पतींवर अवलंबून आहेत. अमरवेलसारखी परजीवी वनस्पती दुसऱ्या झाडावर वाढते. ती यजमान झाडाकडून अन्न व खनिजे घेत राहते, त्या झाडाला कमकुवत बनवते आणि स्वतः मात्र सशक्त होते. अशी बांडगुळे माणसाच्या रूपातही आज समाजात पाहायला मिळतात.

आज अशा ओज्यामुळे अनेक जण वाकून गेले आहेत. कामाच्या ठिकाणी कामचुकार लोक आपले काम इतरांकडून करून घेऊन स्वतः ऐदीपणाचे जीवन जगत आहेत. सवलतीस पात्र नसतानाही काही जण अंध व अपंगांच्या विशेष सवलती लाटत आहेत. लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन काही जण इतरांना नागवतात. काहीजण लाभार्थ्यांना अंधारात ठेवून त्यांचा लाभ स्वतः बळकावतात. भ्रष्ट मार्गाने मिळालेल्या संपत्तीतून सत्ता मिळवून काहीजण सत्यवचनी, सरळमार्गी लोकांना स्वतःच्या दावणीला बांधतात.

खाजगीकरणातून निर्माण झालेली सरंजामदारी सामान्यांच्या शोषणावर उभी राहिली आहे. आज कामगारांचा प्रचंड मोठा वर्ग कंत्राटी नोकऱ्या, गिग प्लॅटफॉर्म काम, असंघटित रोजगार अशा अस्थिर परिस्थितीत वारंवार नोकऱ्या बदलत मिळेल ते काम करत आहे. हा सर्व कामगारवर्गाच्या खांद्यावर जगण्यामरण्याची मजबुरी ओळखून प्रत्यक्ष कामापेक्षा दुप्पट-तिप्पट भार दिला जात आहे. कोणतीही सामाजिक सुरक्षा न देता या कामगारांना आपल्या धन्यांना धनवान करण्यासाठी स्वतःचे खांदे झिजवावे लागत आहेत. त्यांच्या मालकांच्या भरभराटीचे ओझे हे कामगार मुकाट्याने सोसत आहेत. त्यांच्या कामाला ना प्रतिष्ठा आहे, ना योग्य मोबदला. मुलांचे शिक्षण, आरोग्य, घर-संसार या सर्व गरजा भागवण्यासाठी या कामगारांची सतत फरपट होत असते.


नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रस्थापित नेत्यांनी आपल्या दुसऱ्या पिढीला मैदानात उतरवून निवडून आणले आहे. याउलट अनेक वर्षांपासून तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळालेली नाही. त्यांच्यावर या युवा नेत्यांचे राजकीय भवितव्य घडवण्याचे ओझे येऊन पडले आहे.

नदीच्या उगमाकडील शहरांमधून नदीत सांडपाणी सोडल्यामुळे नद्या प्रदूषित होत आहेत. पुढील गावांमधील व शहरांमधील लोकांना हे दूषित पाणी प्यावे लागत आहे. अशा प्रकारे दुसऱ्यांनी निर्माण केलेल्या प्रदूषणाचे ओझे निष्पाप लोकांना सहन करावे लागत आहे.

अमेरिकेसारखा सर्वाधिक कार्बन उत्सर्जन करणारा देश पृथ्वीचे तापमान वाढवण्यात आघाडीवर आहे. तेथील लोकांचा अमर्याद ऊर्जा वापर जगातील इतर देशांना भोगावा लागत आहे.

एपस्टीनच्या कृष्णकृत्यांचा पदार्फाश झाला आहे. मोठमोठ्या धनिकांच्या घृणास्पद लैंगिक सुखाचे ओझे अनेक आश्रयहीन मुली, अडनिड्या आणि पोंगांडावस्थेतील नवतरुणींना सोसावे लागले. अशा लैंगिक शोषणाचे ओरखडे आणि मानसिक ओझे अनेक निष्पाप मुली व महिलांनी दीर्घकाळ सहन केले आहे.

वेदना व्यक्त केल्या जातात, पण त्यातून खरे समाधान मिळत नाही; फक्त पोकळ दिलासा मिळतो—हेच 'सामना' चित्रपटातील या गीतातून सांगितले आहे. बदल घडवायचा असेल तर आधी बळी कोण देणार? नेहमी त्याग करणाऱ्यालाच आधी त्रास सहन करावा लागतो—हे कटू वास्तवही या गीतातून समोर येते. तरीसुद्धा हे गीत जगणे म्हणजे संघर्ष, प्रश्न विचारणे आणि हरूनही स्वाभिमान टिकवणे यालाच सर्वश्रेष्ठ ठरवते.



**- किशोर जाधव,सोलापूर**
- मो. नं. ९९२२८८२५४१

## 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शहीदी समागमाची भव्य तयारी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नवीन मुंबईतील 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमासाठी प्रशासन सज्ज आहे. हा कार्यक्रम केवळ धार्मिक उत्सव नाही, तर सामाजिक ऐक्य, सद्भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

गुरु तेग बहादूर साहेबजींनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांसाठी दिलेले बलिदान हे एक अद्वितीय उदाहरण असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. त्यांच्या शौर्य आणि त्यागाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे हा या समागमाचा प्रमुख उद्देश आहे. प्रशासनाने वाहतूक, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छता, निवास आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांचे आयोजन केले आहे. धार्मिक संस्था, सामाजिक संघटना आणि शासन यांचा समन्वय या कार्यक्रमाला भव्य आणि शिस्तबद्ध स्वरूप देईल. मुख्य समागम २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईत होणार आहे, जिथे देशभरातून भाविक, संत-महंत, धार्मिक नेते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

यापूर्वी नागपूर आणि नांदेड येथे यशस्वीपणे आयोजित शहीदी समागमांमुळे नवी मुंबईतील कार्यक्रमही प्रेरणादायी आणि भव्य होणार, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. हे समागम महाराष्ट्र आणि पंजाब राज्यांमधील सामाजिक व सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करेल आणि गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या बलिदानाचा संदेश समाजात सद्भावना, ऐक्य आणि मानवतेच्या रक्षणासाठी नवी प्रेरणा निर्माण करेल.

## 'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज'च्या सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरचे दिमाखात उद्घाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या आयटी क्षेत्रातील वाटचालीत एक सकारात्मक पाऊल पडले आहे. 'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज' या कंपनीच्या नवीन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरचा उद्घाटन सोहळा होटगी रोडवरील इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये उत्साहात पार पडला. या सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरमुळे सोलापूरच्या स्थानिक तरुण तंत्रज्ञांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहे.

'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज' कंपनीच्या नवीन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरमुळे सोलापूरची आयटी पार्कच्या दिशेने होत असलेली वाटचाल अधिक भक्कम झाली आहे. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू गोपाळकृष्ण जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत या सेंटरचे उदघाटन करण्यात आले.

आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या साकेत मोकाटे आणि प्रसाद कंदलगावकर या दोन तरुण मित्रांनी एकत्र येऊन ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज ही कंपनी २०१५ मधे सुरू केली आहे. आपल्या कौशल्याच्या जोरावर सोलापुरात उद्योजकता वाढवतानाच स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे संचालक साकेत मोकाटे आणि प्रसाद कंदलगावकर यांनी सांगितले.

या नवीन कंपनीमुळे सोलापुरातील तंत्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना आता शहरातच कामाच्या उत्तम संधी मिळणार आहेत, जी शहराच्या भविष्यातील विकासासाठी एक सकारात्मक बाब मानली जात आहे. या सोहळ्याप्रसंगी सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, लक्ष्मी हायड्रोलिक कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे, सिंहगड कॉलेजचे प्राचार्य शंकर नवले, ज्ञानप्रबोधिनीचे संचालक अमोल गांगजी, पेठे फुड्सच्या संचालिका सुवर्ण पेठे, मीना मोकाटे, आशा कंदलगावकर, सच्चिदानंद व्हटकर, अविनाश गवळी, दर्शन रुईकर या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. या सर्वांनी तरुण संचालकांच्या धाडसाचे कौतुक करत कंपनीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज टीमचे सदस्य ओंकार व्हटकर, सोहन आगळे, प्रथमेश दुधनीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज' कंपनीचे पुण्यात बावधनला कार्यालय असून तिथे वीस तरुण तंत्रज्ञ कार्यरत आहेत. 'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज' कंपनीमुळे सोलापूरच्या औद्योगिक नकाशावर आयटी क्षेत्राचे स्थान अधिक ठळक झाले आहे.

आम्ही दहा वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहोत. आता सोलापुरात काम सुरू करत आहोत. वीस जणांची टीम आहे. पुढेही अनेकांना संधी मिळेल. आयटी क्षेत्रात सोलापूर खूप मोठे होईल. आम्ही सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, प्रॉडक्ट डेव्हलपमेंटमध्ये काम करतो आणि ग्लोबल कंपनींना आमच्या सेवा देत आहोत. अनेक नव्या विषयांवर काम सुरू आहे. इच्छुक तरुण आम्हाला संपर्क करू शकतात.

**-साकेत मोकाटे आणि प्रसाद कंदलगावकर**
(ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज)

सोलापूरमध्ये आयटी पार्क सुरू होणार आहे, या पार्श्वभूमीवर ॲपरिलाय टेक्नॉलॉजीजची सुरुवात सकारात्मक आहे. आपल्या शहरांमध्ये आयटी क्षेत्राचा प्रगतीसाठी भरपूर वाव आहे. आयटी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या प्रसाद आणि साकेत या दोघांची टीम वेगवेगळ्या देशांमध्ये सेवा देत आहे. या माध्यमातून येथील तरुणांना मोठ्या संधी मिळणार आहेत. साकेत आणि प्रसाद यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**-डॉ. सचिन ओंबासे,** आयुक्त, सोलापूर महापालिका

# रोहित पवारांनी केलेले दावे धक्कादायक - हेमंत पाटील

## 'दादां'च्या अपघातातील सत्य बाहेर यावे; चौकशीचा पुनःरोच्चार

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी केलेले दावे अत्यंत धक्कादायक असून संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि स्वतंत्र निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे, अशी मागणी भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी शुक्रवारी (ता. १३) केली.याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र पाठवणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दादांच्या अपघातानंतर सर्वात अगोदर २८ जानेवारी रोजीच पुणे पोलीस आयुक्तांना नोटीस पाठवून पाटील यांनी चौकशीची मागणी केली होती, हे विशेष.



रोहित यांनी पत्रकार परिषदेत काही छायाचित्रे सादर करत अपघाताशी संबंधित तांत्रिक बाबींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'हा अपघात नसून १००% घात असू शकतो,' असा गंभीर आरोप त्यांनी केला होता. 'दादा' कारने पुण्याला जाणार होते, मग अचानक विमानाने का गेले? पायलट शेवटच्या क्षणी का बदलला? उड्डाणापूर्वी नेमके काय घडले? या घटनेत कुणाचा सहभाग असू शकतो का? असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. पवार कुटुंबियांकडूनच झालेल्या या आरोपांनंतर नागरिकांमध्ये संशय आणखी बळावला आहे. या शंकांचे निराकरण होणे त्यामुळे अत्यंत गरजेचे असल्याचे पाटील म्हणाले.

अपघातानंतर दादांच्या मृतदेहावर असामान्य सूज दिसून आल्याचा दावा करत त्यामागील कारणांची वैद्यकीय चौकशीची रोहित पवार यांची मागणी योग्य असल्याचे पाटील म्हणाले. रोहित यांच्या आरोपांमुळे मात्र राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून सत्य बाहेर येईपर्यंत जनतेच्या मनातील संशय दूर होणार नाही, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

## शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे शिवजयंती उत्सवाला प्रारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सवाला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ करण्यात आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभली. आमदार सुभाष देशमुख, महापौर विनायक कोड्याल,उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते महाराजाच्या मूतीर्ची विधिवत पूजा करून आरती करण्यात आली. यावेळी जय भवानी जय शिवाजीच्या घोषणाने परिसर दुमदुमून गेला होता.

शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता डाळिंब आड येथील मैदानात भगव्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली.यानंतर महाप्रसादाचे वाटप करून शिवजयंती उत्सवाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.


परिसर जय भवानी जय शिवाजी घोषणांनी आणि ढोल-ताशांच्या गजरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. दरम्यान, १९ फेब्रुवारी पर्यंत शिवजयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. , मदार्नी खेळांचे प्रात्यक्षिक, महिलांसाठी विशेष उपक्रम तसेच कुस्ती तसेच युवकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या सर्व कार्यक्रमांना शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. शिवजयंती उत्सवामुळे शहरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महापालिकेतील नगर अभियंता, विद्युत विभाग तसेच घनकचरा विभागातील स्वच्छता कर्मचारी महिलांचा मध्यवर्तीच्यावतीने शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मध्यवर्ती महामंडळाच्या ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे- बचुटे, संजीवनी मुळे, उज्वला साळुंखे, राजन जाधव, श्रीकांत डांगे, श्रीकांत घाडगे, नगरसेवक विनोद भोसले, शिवाजी वाघमोडे, ज्ञानेश्वर सपाटे, बाबासाहेब जाधव, दत्तामामा मुळे, सुशील बंदपट्टे, आशुतोष बरडे, विजय पुकाळे, प्रकाश ननवरे, भाऊसाहेब रोडगे, राजू काकडे, बापू जाधव, सुषमाताई घाडगे, मनीषा माने, चारुशीला जगदाळे, यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास घुले,सचिन स्वामी यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

## शिवजयंती दिनी 'मेरा युवा भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यभरात 'माय भारत' (मेरा युवा भारत) मेगा पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी त्याबाबत काटेकोर नियोजन करून उपक्रम यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त या पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागासह अन्य सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने तयारी करून हा उपक्रम यशस्वी करावा. विभागात सर्व जिल्ह्यात पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून मुख्य कार्यक्रम सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांशी तात्काळ समन्वय साधून नियोजन करावे. पदयात्रेत अधिकाधिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट आणि गाईड आदीमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी लवकर पदयात्रा आयोजित करावी. मार्गावर आवश्यक तेथे पाण्याची, आरोग्य तपासणी, उपचारासाठी वैद्यकीय पथके, पुरेशा रुग्णवाहिका आदींची व्यवस्था करावी. लहान मुले येणार असतील तर त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजारी मुले सहभागी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आयोजित पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ ठरावी, असेही डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य ती अंमलबजावणी करावी अशा सूचना विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी पोलीस दलाला दिल्या.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'MyBharat' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. पुणे विभागात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

### वात्रटिका

**फोन,फाईल,फ्लाईट**

फोन, फाईल आणि फ्लाईट
इथे संशयीसुई फिरू लागली...
खरंच तसं असेल की काय
याचीच उत्सुकता लागली...
कितीही तट करून ठेवा गुपीत
लोकांना आता पटले आहे...
अपघात बघून विमानाचा
हा घात असावा वाटले होते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# श्री विठ्ठल कारखान्यावर कै. आ. भारतनाना भालके यांची जयंती साजरी

**वेणुनगर, (कटूसत्य वृत्त):–** वेणुनगर – गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे माजी चेअरमन कै.आ.भारतनाना भालके यांचे जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेचे विधीपुर्वक पुजा कारखान्याचे संचालक प्रविण विक्रम कोळेकर यांचे शुभहस्ते व संचालक मंडळाचे उपस्थितीत करण्यात आली.



सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक व कार्यकारी संचालक डी.आर. गायकवाड, तसेच कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी याप्रसंगी कै. आ. भारतनाना भालके यांना आदरांजली वाहुन विनम्र अभिवादन केले.

# साने गुरुजी शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी बिराजदार व्हाईस चेअरमनपदी रचभरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी उल्हास बिराजदार यांची तर व्हाईस चेअरमनपदी फरजाना रचभरे यांची निवड करण्यात आली. साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणुक निर्णय अधिकारी सुरेश जुजगार यांच्या





अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी चेअरमन व व्हाईस चेअरमनपदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड झाल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी सुरेश जुजगार यांनी जाहीर केले. यावेळी पतसंस्थेचे सचिव आप्पाराव इटेकर, विरभद्र यादवाड,सुनिल चव्हाण, भिमराया कापसे, मुरलीधर कडलासकर, भाऊसाहेब मोरे, जयंत गायकवाड, शिवानंद हिरेमठ महादेवी पाटील आदि संचालक उपस्थित होते.

# फार्मसी विद्यार्थ्यांची औषधी वनस्पती उद्यानाला शैक्षणिक भेट

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** एस.व्ही.एस कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च टेंभुर्णीच्या प्रथम/द्वितीय (B.Pharm/D.Pharm) विद्यार्थ्यांसाठी नुकतीच वसुंधरा औषधी उद्यान आणि वृक्ष संवर्धन इंदापूर येथीलऔषधी वनस्पती उद्यानाला (Medicinal Garden) एक दिवसीय शैक्षणिक




भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष वनस्पतींची ओळख आणि त्यांचे औषधी उपयोग समजावून देणे हा होता.

या भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांना उद्यानातील २०० हून अधिक प्रकारच्या दुर्मिळ आणि उपयुक्त औषधी वनस्पतींचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. यामध्ये प्रामुख्याने अडुळसा, कोरफड, अश्वगंधा, ब्राह्मी, तुळस, भुईआवळा, सर्पगंधा, नागकेशर, आणि सप्तरंगी यांसारख्या वनस्पतींच्या शास्त्रीय नावांची (Botanical Names) आणि त्यांच्या औषधीय गुणांची माहिती वनस्पती तज्ज्ञांनी दिली.

विद्यार्थ्यांनी वनस्पतींचे बा' स्वरूप, पान, फुले आणि मुळे यांचा अभ्यास केला, ज्याचा उपयोग त्यांना 'फामाकीग्नॉसी' (Pharmacognosy) या विषयासाठी होईल. तसेच, आयुवेर्दात वापरल्या जाणाऱ्या विविध औषधांमधील घटकांची निर्मिती आणि गुणवत्ता नियंत्रण कसे केले जाते, याबद्दलही माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना निसगार्शी जवळीक साधण्यासोबतच हर्बल औषध निर्मितीच्या क्षेत्रात (Herbal Drug Industry) करिअर करण्याबद्दल प्रेरणा मिळाली. या भेट यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, कॉलेजचे प्राचार्य कृष्णात ढेकळे,डॉक्टर नेहा काजळे यांचे मार्गदर्शन लाभले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.रेणुका देशपांडे, प्रा. ऐश्वर्या सरवदे, प्रा.अभिषेक घागरे, प्रा. सृष्टी काळे, प्रा.भाग्यश्री घाडगे, प्रा.दिग्विजय पाटील यांनी परिश्रम घेतले

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# भांडवलदारांना देश विकण्यासाठी आणलेले नवीन चार कामगार कायदे तात्काळ रद्द करा- कॉ कुलकर्णी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** 'इज ऑफ डूइंग बिजनेस' च्या नावाखाली भांडवलदारांना उद्योग करताना कामगारांचे अधिकाधिक शोषण करून अधिक नफा वसूल करता यावा या उद्देशाने आजपर्यंत संघर्ष करून मिळविलेले वेगवेगळे कामगार कायदे रद्द करून नवीन चार कामगार कायदे या शासनाने आणलेले आहेत. 'चार कामगार कायदे' कामगारांच्या हिताची असल्याचे सरकारकडून अनेकदा सांगण्यात येत आहे परंतु कुठल्याही क्षेत्रातील कामगारांनी या कामगार कायद्यांची मागणी केलेली नाही तसेच प्रत्येक क्षेत्रातून या नवीन कामगार कायद्यांना विरोध होतो आहे तरीसुद्धा केवळ भांडवलदारांना व परकीय गुंतवणुकीला येथील उद्योगांमध्ये कामगारांचे शोषण करून अधिकाधिक नफा मिळविता यावा केवळ या एका उद्देशाने सरकारने देशभरातील सर्व संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारावरती हे कायदे लादलेले आहेत. अगदी ब्रिटिश काळापासून कामगारांनी संघर्ष करून वेगवेगळे अधिकार व हक्क मिळवलेले आहेत. त्यामुळे कामगार सध्या उपभोगत असलेले अधिकार व हक्क हे कुठल्याही सरकारने मेहरबानीने कामगारांना दिलेले नसून कामगारांच्या प्रदीर्घ संघषार्तून त्यांनी ते मिळविलेले आहेत. पाशवी बहुमताच्या जोरावर सरकारला हे वाटत आहे की आपण आजपर्यंत संघषार्तून मिळवलेले अनेकांचे या प्रकारचे अधिकार सहजरित्या बदलून आपणास हवे ते कायदे आपण यांच्यावरती लादु शकतो परंतु कामगारांच्या एकजुटीचा व कामगारांच्या ताकदीचा या सरकारला कुठलाही अंदाज नाही. कामगार विरोधी असलेले हे कायदे तात्काळ भारत सरकारने मागे घ्यावे अन्यथा कामगार वर्गास भारतातील प्रत्येक क्षेत्राची चाके थांबविण्याची क्षमता नाईलाजाने वापरावी लागेल हे शासनाने ध्यानात घ्यावे असा इशारा बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी दिला.

नवीन कामगार कायद्यामुळे युनियन स्थापन करणे, संप आयोजित करणे, सक्षम नवीन नेतृत्व निर्माण करणे या सर्व गोष्टी अधिकाधिक कठीण केल्या जात आहेत. भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशात आज करोडो युवक उच्चशिक्षित असून सुद्धा बेरोजगार म्हणून समाजात वावरत आहेत. बेरोजगारी सारखा अतिशय मोठा प्रश्न असताना व युवकांच्या हाताला कायमस्वरूपी रोजगाराची गरज असताना सुद्धा 'फिक्ड टर्म एम्प्लॉयमेंट'सारखी नवीन कलमे या कामगार कायद्याद्वारे आणून केवळ तीन ते चार वर्षासाठीच कामगारांची भरती केली जाते आहे व त्या ठराविक मुदतीनंतर कर्मचाऱ्यांना घरी पाठविले जाणार आहे. संपूर्ण आयुष्यभर आपल्या हाताला रोजगार असणे हा आपला मूलभूत अधिकार असताना 'फिक्ड टर्म एम्प्लॉयमेंट'च्या नावाखाली केवळ विशिष्ट अल्प मुदतीच्या कालावधीसाठीच नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते आहे. हे युवकांच्या भविष्याशी खेळणे आहे. कामाचे अनिश्चित तास व कामगारांना कामावरून काढून टाकण्यासाठी अनेक क्लिष्ट परवानग्यांची गरज नसणे यासारख्या अनेक कामगार विरोधी गोष्टी अंतर्भूत केल्या जात आहेत ज्याला आपण एक दिलाने व संपूर्ण ताकतीने विरोध करायला हवा म्हणूनच आजचा संप हा अटळ बनलेला आहे असे बँक कर्मचाऱ्यांचे युवा नेते कॉम्रेड दीपक माने यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना म्हटले.

केंद्र सरकार आयएमएफ, वर्ल्ड बँक इत्यादी संस्थांच्या दबावाखाली येऊन वित्त भांडवलाच्या हिताचे निर्णय घेऊ पाहत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका,विमा कंपन्या, GIC यामधील निरगुंतवणूक हा त्याचाच एक भाग आहे. एकीकडे आत्मनिर्भर भारताच्या घोषणा करायच्या तर दुसरीकडे फायद्यात असणाऱ्या व सरकारला अमाप लाभांश मिळवून देणाऱ्या संस्था निर्गुतुणकीच्या माध्यमातून परकीय भांडवलासाठी खुल्या करायच्या व येथील लोकांच्या हिताला बाधा पोहोचवायची हे धोरण सरकार राबवीत आहे. सरकारने खाजगीकरणाचे हे धोरण तात्काळ थांबवावे अन्यथा कामगारांना बेमुदत संपावर जावे लागेल असा इशारा विमा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड कमलाकर एचवाड यांनी दिला.

भारत–अमेरिका व्यापार करार असो की नवीन चार कामगार कायदे असो या मार्गाने सरकार देशातील जनतेला पुन्हा पारतंत्र्यात ढकलू पाहत आहे. अशा निर्णयामधून भारत आपली स्वायत्तता अधिकाधिक गमावीत आहे व येथील जनतेला आर्थिक, राजकीय,सांस्कृतिक पारतंत्र्यात ढकलीत आहे याचा निषेध म्हणून आज आम्ही संपामध्ये उतरलो आहोत असे महाराष्ट्र स्टेट बँक एम्पलोयीज फेडरेशन अध्यक्ष कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.सरकारने नवीन कामगार कायदे तात्काळ रद्द करावीत, सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी,सर्व ठिकाणचे कंत्राटीकरण रद्द करून कायमस्वरूपी नोकऱ्या बेरोजगारांना द्याव्यात, मोठ्या कर्जबुडव्याकडून तात्काळ कर्जाची वसुली करण्यात यावी, नवीन व्यापार करारानुसार अमेरिकेकडून होणारी कृषी आयात तात्काळ थांबवावी या सर्व मागण्यासह देशभरातील प्रमुख 10 संघटना संपामध्ये उतरल्या होत्या. तीव्र निदर्शने,मोर्चे, मोटर सायकल रॅली यासारखे निषेधाचे व आंदोलनाचे वेगवेगळे मार्ग वापरून देशभरामध्ये संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी कॉम्रेड परमेश्वर बडगिरे, कॉम्रेड कलीम पठाण, कॉम्रेड महेश गांधले, कॉम्रेड सदाशिव मुगावे यासह लातूर शहर व परिसरातील बँकिंग व विमा क्षेत्रातील शंभर पेक्षा अधिक कर्मचारी उपस्थित होते.

# ६० ते ८० वयोगटातील ज्येष्ठ नागरिक संगीताच्या सूरांतून जीवनाची मैफली साजरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** मन जेव्हा संगीताच्या तालावर थिरकतं, तेव्हा वय अडथळा ठरत नाही. हेच सिद्ध करत ६० ते ८० वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्साही गायन गट 'हमिंग बर्ड्स' मुंबईत 'दिल चाहता है' ही भावपूर्ण संगीत संध्याकाळ सादर करणार आहे. हा कार्यक्रम २० फेब्रुवारी रोजी माटुंगा येथील किंग सर्कलमधील म्हैसूर असोसिएशन हॉलमध्ये होणार आहे.

दशकांपासून संगीताची आवड जपणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांनी स्थापन केलेला 'हमिंग बर्ड्स' हा गट सक्रिय वृद्धावस्था, सर्जनशीलता आणि मैत्रीचा सुंदर मैफली आहे. भूतकाळातील आठवणी जागवणारी, पण आजही तितकीच ताजी वाटणारी हिंदी चित्रपटसंगीतातील सदाबहार गाणी ते या कार्यक्रमात सादर करणार आहेत.

या संध्याकाळी किशोर पारुलेकर, सुबोध एकबोटे, प्रवीण दोशी, सुमन गोकर्ण, राजेश राणे, जानविका, उदय दामले, मनोज क्षीरसागर,हर्षा मेहता तसेच इतर सदस्य आपली गाणी सादर करतील.

'कभी कभी मेरे दिल में', 'तेरे मेरे मिलन की ये रैना', 'कहीं दूर जब दिन ढल जाये', 'सलाम–ए–इश्क मेरी जान' आणि 'अभी ना जाओ छोड़ कर' यांसारखी गाणी कार्यक्रमाची खास आकर्षणे असतील. विशेष म्हणजे 'कभी कभी' चित्रपटातील 'कभी कभी



मेरे दिल में' हे गाणे संवादांसह सादर केले जाणार असून, ते संपूर्ण संध्याकाळतील सर्वात भावस्पर्शी क्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमाबद्दल बोलताना गटातील ज्येष्ठ सदस्य आणि रिटायर इंजीनियर प्रवीण दोशी (वय ८०) म्हणतात, 'संगीत आयुष्यभर माझा सोबती राहिलं आहे.


वय वाढलं की आयुष्य थांबतं असं अनेकांना वाटतं, पण गाणं मला आजही नवी ऊर्जा देतं. 'हमिंग बर्ड्स' हा आमच्यासाठी फक्त गट नाही, तर एक कुटुंब आहे. 'दिल चाहता है' या कार्यक्रमातून आम्ही एवढंच सांगू इच्छितो की मन कधीच म्हातारं होत नाही.'या सादरीकरणाविषयी गटातील सदस्य आणि इंटिरियर डिझायनर सुबोध एकबोटे (वय ६५) सांगतात,'कभी कभी मेरे दिल में' हे गाणं माज्यासाठी खूप खास आहे. काळ जसा पुढे गेला, तसं या गाण्याचा अर्थ अधिक खोल वाटू लागला. संवादांसह सादर केल्यावर ते फक्त गाणं राहत नाही, तर आयुष्यातील क्षण पुन्हा जगल्यासारखं वाटतं. काही गाणी जुनी होत नाहीत—ती आपल्यासोबतच परिपक्व होत जातात.'

ज्या काळात वाढत्या वयाकडे मर्यादेप्रमाणे पाहिलं जातं, त्या काळात 'हमिंग बर्ड्स' एक प्रेरणादायी उदाहरण उभं करत आहे—जिथे आवड जिवंत आहे, मैत्री घट्ट आहे आणि सर्जनशीलतेला नवं रूप मिळत आहे. 'दिल चाहता है' हा फक्त संगीत कार्यक्रम नाही, तर आयुष्य, आठवणी आणि न संपणाऱ्या सूरांना दिलेली एक मनापासूनची सलामी आहे.

# सोलापूरात शालेय शहर खो-खो स्पर्धा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शहरातील शालेय क्रीडाप्रेमींसाठी आनंदाची बातमी असून १४ वर्षाखालील मुलांच्या शालेय शहरस्तरीय खो–खो स्पर्धांचे आयोजन रविवारी, १५ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. 'राष्ट्रीय खो–खोपटू किरण पवार स्मृती करंडक' या नावाने होणाऱ्या या स्पर्धा सकाळी ८ वाजता डाळिंबी आड मैदान, शिंदे चौक येथे सुरू होणार आहेत. या स्पर्धांचे आयोजन श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले असून सोलापूर ॲम्युचर खो–खो असोसिएशनची मान्यता आणि उत्कर्ष क्रीडा मंडळाचे सहकार्य लाभले आहे. शहरातील शालेय स्तरावर खो–खो खेळाला प्रोत्साहन देणे आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. स्पर्धेत विजेत्या संघाला ७ हजार रुपये व करंडक, उपविजेत्या संघाला ५ हजार रुपये व करंडक, तर तृतीय क्रमांकाच्या संघाला ३ हजार रुपये व करंडक प्रदान करण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेत चुरशीचे सामने पाहायला मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ५ फेब्रुवारी २०१२ अथवा त्यानंतर जन्मलेली मुले या स्पधेर्साठी पात्र ठरणार आहेत. शहरातील सर्व शाळांच्या संघांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. इच्छुक संघांनी नोंदणी व अधिक माहितीसाठी शिवशंकर राठोड (मो. ७०२०८६९७२९) किंवा शितलकुमार शिंदे (मो. ९७६३८९१४०१) यांच्याशी संपर्क साधावा. श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे अध्यक्ष जयवंत सलगर यांनी जास्तीत जास्त शालेय संघांनी सहभागी होऊन स्पधेर्चे यश वाढवावे, असे आवाहन केले आहे. शहरातील क्रीडाप्रेमींसाठी ही स्पर्धा उत्साहवर्धक ठरणार असून, नवोदित खेळाडूंना आपली कौशल्ये दाखवण्याची ही उत्तम संधी ठरणार आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु – 178

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# सहकार महर्षींना तालुक्यात अनेक संस्थांकडून अभिवादन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते व माळशिरस तालुक्यातील सहकारी संस्थांचे संस्थापक स. म.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या ४७ व्या पुण्यतिथी निमित्त शिवरत्न बंगला येथील सहकार महर्षी यांच्या समाधीस्थळाचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह विविध सहकारी व शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, कामगार यांनी दर्शन घेवुन अभिवादन केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या ४७ व्या पुण्यतिथी निमित्त शंकरनगर अकलुज येथील सहकार महर्षी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स.म.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुतळ्यास व्हा.चेअरमन ॲड. शंकरराव माने देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांच्यासह सर्व संचालक, खातेप्रमुख, कामगार प्रतिनिधी व कामगार उपस्थित होते. सहकार महर्षी कै.शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ८ वाजता सहकार महर्षी कै. काकासाहेब यांचे प्रतिमेची मिरवणूक शिवरत्न बंगला ते जनरल ऑफिस समोरील महर्षींच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली.

सकाळी ९ वाजता कारखाना जनरल ऑफिस समोरील सहकार महर्षी कै.काकासाहेब यांचे पूर्णाकृती पुतळ्याची विधिवत पूजा व श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सकाळी ९.३० वाजता सहकार महर्षींच्या जीवनावर गीते व भाषणे घेण्यात आली.

रात्री ८ वाजता ह.भ.प.श्री. अंकुश रणखांबे महाराज रा गिरवी ता. इंदापूर जि.पुणे यांचे किर्तन सेवा कारखाना जनरल ऑफिस समोर घेण्यात आली.

विजयचौक येथील सहकार महर्षी यांच्या पुतळ्यास अकलूज नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सर्व नगरसेवक उपस्थित होते.

विजयनगर विझोरी येथे शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाच्या कार्यस्थळावर सहकार महर्षी यांच्या पुतळ्यास व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे यांच्या हस्ते पुष्पहार, पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

यावेळी सर्व संचालक मंडळ,कार्य. संचालक रविराज इनामदार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, कामगार उपस्थित होते.

अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील सहकार महर्षींच्या पुणार्कृती पुतळ्यास बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपसभापती मामासाहेब पांढरे, सचिव राजेंद्र काकडे, संचालक व कामगार उपस्थित होते.

सदाशिवनगर येथे विश्वतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आली.

यावेळी चेअरमन आ रणजितसिंह मोहिते पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, व्हा चेअरमन ॲड. मिलींद कुलकर्णी, माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, वैष्णवीदेवी मोहिते पाटील, कार्यकारी संचालक स्वरुप देशमुख, सेक्रेटरी रवीराज जगताप, संचालक मंडळ, अधिकारी व कामगार उपस्थित होते.

शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि.अकलूज या संस्थेत सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांची पुण्यतिथी निमित्त संघाचे चेअरमन नितीनराजे निंबाळकर, व्हा.चेअरमन हनुमंत सोलनकर, मॅनेजर शुभम गोरे, अविनाश जाधव, यशराज निंबाळकर, अनिल कोकाटे, गजुनाना शिंदे, सुमित लवटे यांचे हस्ते पूजन करण्यात आले.

तालुक्यात शिक्षण प्रसारक मंडळ, शिवरत्न शिक्षण संस्था, शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, शिवशंकर बझार, सुमित्रा पतसंस्था, शंकरराव मोहिते पाटील पतसंस्था, अकलूज विकास सोसायटी, शंकरनगर विकास सोसायटी, शंकरनगर ग्रामपंचायत आदींच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन सहकार महर्षींना अभिवादन करण्यात आले.

# शिवजयंतीनिमित्त मध्यवर्ती महामंडळातर्फे आजपासून विविध कार्यक्रम



**पुतळा परिसराचे सध्याचे सुशोभीकरण महामंडळाला मान्य नाही**

महापालिकेकडून सध्या शिवरायांचा पुतळा परिसराचे सुशोभीकरण सुरू आहे, हे काम महामंडळाला मान्य नाही. शिवजयंतीनंतर महामंडळ यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करणार आहे. या ठिकाणी ऐतिहासिक पद्धतीचे स्मारक व्हावे, अशी महामंडळाची अपेक्षा आहे, असे महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, श्रीकांत डांगे यांनी सांगितले.

**१९ फेब्रुवारी रोजी मिरवणूक**

दि. १९ फेब्रुवारी दुपारी ४ वाजता विविध मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठीत मूतीर्ची पूजा करून डाळींबी आड येथून मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे.डाळींबी आड येथून पारंपारिक मार्गाने म्हणजेच सरस्वती बुक डेपो, नवी पेठ, मेकॅनिक चौक, भागवत थिएटर, छ. शिवाजी महाराज चौक, म. गांधी रोड, बाळीवेस, मधला मारूती, माणिक चौक, दत्त चौक, राजवाडे चौक, चौपाड़ विठ्ठल मंदिर मार्गे निघून डाळींबी आड मैदान येथे विसर्जित होईल. मिरवणुकीमध्ये सोलापूर शहरातील वारकरी संघटनेचे भजनी मंडळ, लेझीम, झांज, ढोल पथक, छत्रपतींच्या जीवनातील देखावे, लेझर शो इत्यादी विविध प्रकार सादर करण्यात येणार आहेत.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १३ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहरातील डाळींबी आड मैदान, शिंदे चौक येथे शिवाजी महाराज जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्रींची स्थापना महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. रविवार 15 फेब्रुवारी रोजी कबड्डी खो-खो स्पर्धा, 17 फेब्रुवारी रोजी कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहे.

शिवजन्मोत्सवाचा पाळणा कार्यक्रम १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक येथे आयोजित केला आहे. या पाळण्याच्या कार्यक्रमासाठी सोलापूर शहर व जिल्ह्यातील शहिद माता, शहिद पत्नी, शहिदांच्या कन्या, विशेष गुणवत्ताधारक महिला यांना खास आमंत्रित करण्यात आले असून त्यांच्या हस्ते पाळण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर व आजूबाजूच्या परिसरातील हजारो महिलांना एकत्रित आणून सामुहिकरित्या पाळणा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी उपस्थित राहणाऱ्या महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये म्हणून मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसेविका रात्रंदिवस परिश्रम घेत असून या कार्यक्रमासाठी सर्व शासकीय यंत्रणेशी संपर्क व समन्वय साधून योग्य नियोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी सोलापूर शहर व जिल्हा परिसरातून हजारो नागरीक वाहनाद्वारे येणार असल्याने येथे येणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. पारस इस्टेट, सुराणा मार्केट, अजंठा लॉज या ठिकाणी पार्क चौक, भैय्या चौक परिसरातून येणाऱ्यांनी पार्किंग करावे. हॉटेल ॲंबेसडर ते प्रभाकर महाराज मंदिर रस्ता एक बाजूस, छत्रपति संभाजी महाराज चौक, पुणे महामार्गावरून येणारी सर्व वाहने तसेच भवानी पेठ भागातून येणाऱ्या वाहनांनी पार्किंग करावे. बाजी आण्णा मठ ते पत्रा तालीम रस्ता येथे कोंतम चौक, बाळीवेस मार्गे येणाऱ्या वाहनांनी या रस्त्यावर एका बाजूस पार्किंग करावे, असे आवाहन महामंडळातर्फे करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, श्रीकांत डांगे, शिवाजी वाघमोडे, राजन जाधव आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी तुती लागवडीकडे वळावे - अपर जिल्हाधिकारी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात 10 फेब्रुवारी ते 11 मार्च 2026 या कालावधीत रेशीम उद्योगाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महा-रेशीम अभियान 2026-27 राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत रेशीम रथाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी व निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. पारंपरिक शेतीसोबत तुती लागवड हा एक उत्तम पूरक व्यवसाय असून इतर पिकांच्या तुलनेत अधिक नफा मिळत असल्याने शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

कार्यक्रमास रेशीम विकास अधिकारी श्रेणी-1 विनित सुनिता सुरेश पवार, वरिष्ठ क्षेत्र सहायक गवंड एम.जे., क्षेत्र सहायक सूर्यवंशी बी.एन., जिल्हा रेशीम कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण 2023-28' अंतर्गत रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी राज्यभर विविध उपक्रम राबविले जात आहेत. कृषी व वनसंपत्तीवर आधारित रेशीम उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीची क्षमता असून जिल्ह्यातील अनुकूल हवामानामुळे या उद्योगाला मोठा वाव आहे.

पारंपरिक शेतीसोबत तुती लागवड हा एक उत्तम पूरक व्यवसाय असून इतर पिकांच्या तुलनेत अधिक नफा मिळत असल्याने शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी रेशीम शेती, तुती लागवड, कोष उत्पादन तसेच शासनाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

नवीन तुती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पंचायत समिती/तालुका कृषी अधिकारी कार्यालय अथवा जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर मार्फत तुती लागवड योजना कार्यान्वित असून अनुदान व इतर अनुशंगिक बाबींची पूर्तता करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून रेशीम शेतीविषयी माहिती घ्यावी व तुती लागवडीतून रेशीम कोष उत्पादन करून नफा मिळवावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी केले.

# शांती चौक स्मशानभूमीची महापौरांकडून पाहणी

## सुधारणा करण्याचे दिल्या सूचना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष डॉ. सुर्यप्रकाश राजेश कोठे यांनी शांती चौक, गांधी नगर, रंगराज नगर (हैद्राबाद-विजापूर बायपास जवळ) येथील पदमशाली समाजचे स्मशानभूमी व हिंदू स्मशानभूमीची दयनीय अवस्था लक्षात आणून देत महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनाची तात्काळ दखल घेत महापौर विनायक कोंड्याल यांनी आज पदमशाली समाजचे स्मशानभूमी व हिंदू स्मशानभूमी तसेच जडे साब मुस्लिम कब्रस्तान संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त सौ. वीणा पवार,पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष डॉ. सुर्यप्रकाश राजेश कोठे,अध्यक्ष सुरेश फलमारी, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, सफाई अधिकारी अनिल चारटे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.पाहणीदरम्यान स्मशानभूमीत योग्य नावफलक नसणे, संरक्षक भिंत व प्रवेशद्वाराचा अभाव, सर्वत्र कचरा व अस्वच्छता, तसेच अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित व सन्मानजनक प्रवेशमार्ग नसल्याचे निदर्शनास आले. या परिस्थितीमुळे नागरिकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब महापौरांनी गांभीयार्ने घेतली. महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याचे, संरक्षक भिंत व प्रवेशद्वार (गेट) उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे, स्पष्ट व सुबक नावफलक लावण्याचे तसेच अंत्यसंस्कारासाठी आवश्यक मूलभूत सुविधा व सुरक्षित प्रवेशमार्ग उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. 'स्मशानभूमी ही आपल्या संस्कृती, श्रद्धा व मानवी संवेदनांशी निगडित जागा आहे. या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता व सन्मान अबाधित राहणे आवश्यक आहे. नागरिकांच्या भावनांचा आदर राखून आवश्यक त्या सर्व सुधारणा तातडीने करण्यात येतील,' असे आश्वासन महापौरांनी यावेळी दिले.

महापौरांच्या या तत्पर भूमिकेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सोलापूरमध्ये प्रथमच Educating All संकल्पनेवर टेडेक्ससिंहगड सीओई 2026



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात नवा मैलाचा दगड ठरत, एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव यांच्या वतीने 31 जानेवारी 2026 रोजी TEDxSinhgad COE 2026 अंतर्गत 'ट्रेड एक्स 2026' या विशेष कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सोलापूर पंचक्रोशीमध्ये प्रथमच TEDx संकल्पनेअंतर्गत झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला.

कार्यक्रमाची यंदाची संकल्पना "Educating AI -कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षण, विचार व कौशल्यांची जडणघडण' अशी होती. सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात शिक्षण, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष, उद्योजकता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर सखोल व प्रेरणादायी मंथन झाले.

या TEDx Talk मध्ये पाच विविध क्षेत्रांतील मान्यवर वक्त्यांनी आपले विचार मांडले. कॉर्पोरेट ट्रेनर डॉ. अर्शद सय्यद, लेखक अतुल कहाते, इन्फ्लुएंसर मंदार पाडवळ, उद्योजिका ऐश्वर्या यादव आणि उद्योजक मुदस्सर अली रंगरेज यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची वाढती भूमिका, भविष्यातील करिअर संधी आणि विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाच्या कौशल्यांवर मार्गदर्शन केले.

त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवविचारांची चैतन्यपूर्ण ऊर्जा निर्माण झाली.

या कार्यक्रमाला 150 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांसह विविध वयोगटातील प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तसेच फोक ऑर्केस्ट्रा, समूह गायन व समूह नृत्य अशा सांस्कृतिक सादरीकरणांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी जाधव आणि ऐश्वर्या यादव यांनी केले. संपूर्ण आयोजनाची धुरा प्रा. डॉ. प्रदीप तपकिरे आणि त्यांच्या विद्यार्थी टीमने समर्थपणे सांभाळली. या उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले तसेच कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर शहरात प्रथमच TEDx संकल्पनेतून साकार झालेला हा भव्य उपक्रम संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतील एक ऐतिहासिक क्षण ठरला असून, विद्यार्थ्यांना जागतिक व्यासपीठाशी जोडणारा, भविष्याभिमुख दृष्टिकोन देणारा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात सक्षम बनवणारा ठरला आहे.

# निकृष्ट रस्ता दुरुस्तीविरोधात निलेश संगेपाग यांचे अन्नत्याग आंदोलन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्र. १५ मधील कोणापुरे चाळ परिसरात पाईपलाईन कामानंतर करण्यात आलेल्या कथित निकृष्ट रस्ता दुरुस्तीविरोधात सुरू असलेले निलेश श्रीनिवास संगेपाग यांचे अन्नत्याग आंदोलन आज दुसऱ्या दिवशीही सुरू राहिले. प्रशासनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याने आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सदर परिसरात पाईपलाईन काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करताना संपूर्ण रुंदीमध्ये "Like to Like" पद्धतीने डांबरीकरण न करता अत्यल्प जाडीचे नियमबा' अर्धा ते एक इंच कॉंक्रीट टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी रस्त्यावर धूळ उडणे, खड्डे निर्माण होणे व वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहे.

या संदर्भात संगेपाग यांनी यापूर्वी महानगरपालिका प्रशासनाकडे नागरिकांच्या पाठिंब्यासह लेखी निवेदने देऊन संबंधित कंत्राटदारावर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व दर्जेदार डांबरीकरणाची मागणी केली होती. मात्र समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी १२ फेब्रुवारीपासून शांततामय अन्नत्याग आंदोलनास सुरुवात केली आहे.

आंदोलनाच्या पहिल्या दिवशी पासून परिसरातील शेकडो नागरिकांनी आंदोलन स्थळी भेट देत लेखी पाठिंबा नोंदविला. 'हा लढा केवळ एका व्यक्तीचा नसून संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेचा आहे,' अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने जबाबदार व्यक्तींवर आणि अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा निलेश संगेपाग यांनी दिला आहे.

आंदोलन स्थळी श्रीकांत वाघमारे, जुबेर हिरापुरे, मल्लिकार्जुन पिलगेरी, आकाश गायकवाड, सुचित्रा वाघमारे, यांच्यासह अनेक जन सोबत उपस्थित राहत आहेत.

# नेताजी प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, ज्ञानेश्वर म्हेत्रे,राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशुले, धर्मराज बळ्ळारी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, भाग्यश्री महाजन, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र मुलगे, काशिनाथ माळगोंडे, बसवराज तेग्गेळी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथम सरस्वती मातेच्या व विज्ञान शिक्षक कै.शिवकुमार शिरुर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी यशोदा पुजारी, अनुष्का चौगुले, आदिती घुगरे, स्नेहा दासरी, दिव्या शिंदे, श्रावणी हिप्परगी, सपना कंटली व कावेरी पगडयाल आदी विद्यार्थीनींने मनोगतातून शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, माजी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र मुलगे आदींनी मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी म्हणाले, विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे.चांगले गुण मिळवून आई-वडिलांचे व शाळेचे नाव लौकिक करण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार म्हणाले, दहावीचे वर्ष हे जीवनाला कलाटणी देणारे वर्ष आहे . यापुढे गुणांवरुन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश मिळणार आहे.म्हणून जिद्द, चिकाटी , परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आत्मविश्वासाने यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा हंचाटे व पूर्वा रेके यांनी केले तर सृष्टी बोरामणी यांनी आभार मानले.

# डॉल्बीमुक्त शिवजयंती साजरी करण्याचा मध्यवर्ती मंडळाचा आदेश






**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजयंती सण शांतता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा व्हावा, या उद्देशाने सोलापूर शहरातील शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाने डॉल्बी न लावण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ध्वनीप्रदूषणाला आळा बसणार असून नागरिकांच्या आरोग्याचा विचारही साधला जाणार आहे. मध्यवर्ती मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सोलापूरचे पोलीस आयुक्तांनी विशेष कौतुक केले आहे. सार्वजनिक सणोत्सवांमध्ये नियमांचे पालन करून सामाजिक भान जपणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉल्बीमुक्त मिरवणुकीमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, तसेच शहरात शांततापूर्ण वातावरण राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉल्बीच्या अति आवाजामुळे होणारे अपघात, नागरिकांचा त्रास आणि कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी मंडळाने घेतलेला हा निर्णय इतर मंडळांसाठीही आदर्श ठरेल, अशी प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक जबाबदारीचे भान राखत सण साजरा करण्याचा संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे.

# सोलापूरच्या अर्थकारणाला चालना देणारे 'इलेक्ट्रो 2026' प्रदर्शन थाटात उद्घाटन- आयुक्त डॉ. ओंबासे



**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** इलेक्ट्रो प्रदर्शन हे सोलापूरच्या अर्थकारणाला पाठिंबा देणारे व्यासपीठ असून शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी केले. इलेक्ट्रो प्रदर्शनातून दरवर्षी सुमारे 50 कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशनतर्फे इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर्स, टेलिकम्युनिकेशन, होम अप्लायन्सेस, सोलर व फिटनेस इक्विपमेंट्सचे भव्य 'इलेक्ट्रो 2026' प्रदर्शन होम मैदानावर दि. 12 ते 18 फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन व्ही प्लस कंपनीचे सीईओ संदीप पाटील यांच्या हस्ते व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

यावेळी बोलताना संदीप पाटील यांनी व्ही प्लस कंपनीचे लॉंचिंग सोलापुरात होत असल्याचा आनंद व्यक्त केला. भारतीय बनावटीच्या उत्पादनांद्वारे नवीन तंत्रज्ञान व नावीन्यपूर्ण उत्पादने ग्राहकांना देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्ष सुरजरतन धुत यांनी प्रास्ताविकात सांगितले की, इलेक्ट्रो प्रदर्शनाचे हे 26 वे वर्ष असून 25 वर्षांपूर्वी 27 स्टॉल्सपासून सुरू झालेल्या या प्रदर्शनात आज जवळपास 300 स्टॉल्स सहभागी झाले आहेत. यंदा एक लाखांहून अधिक नागरिक प्रदर्शनाला भेट देतील, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक व्ही प्लस असून वीझी टीव्ही, हाईफा इलेक्ट्रिकल, अपार इलेक्ट्रिकल्स, लक्ष्मी ऑटोमोबाइल्स, एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी, बजाज फायनान्स व सॅटीसफाय मीडिया हे सहप्रायोजक आहेत. प्रदर्शनात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे एलसीडी टीव्ही, फ्रिज, साइड-बाय-साइड फ्रिज, एअर कंडिशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टीव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, सोलर सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आयपॅड, टेलिफोन, हेल्थ इक्विपमेंट, कॉम्प्युटर आदी उत्पादने उपलब्ध आहेत.

7 दिवस चालणारे हे प्रदर्शन दररोज दुपारी 4 ते रात्री 9.30 व रविवारी सकाळी 11 ते रात्री 9.30 पर्यंत खुले राहणार आहे. खरेदीदारांसाठी दररोज लकी ड्रॉ व शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. काही स्टॉल्स सामाजिक संस्थांना विनामूल्य देण्यात आले असून दररोज रक्तदान शिबिर व अवयवदान जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच 'रिल्स' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, व्ही प्लस कंपनीचे सुशील कुमार देशमुख, प्रफुल्ल देशमुख तसेच सुमित रामाणी, अतिफ खान, पराग पाटील आदींचा सत्कार करण्यात आला.

सचिव हरीष कुकरेजा यांनी स्वागत केले, तर उपाध्यक्ष भूषण भुतडा यांनी आभार मानले. सूत्रसंचालन साक्षी हौदे यांनी केले. कार्यक्रमास असोसिएशनचे पदाधिकारी, माजी अध्यक्ष व संचालक मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.